
तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के व प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सोबत डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. विलास शिंदे, आदी.

# शिवाजी विद्यापीठात शाहूराजांना अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते आणि ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. राजर्षी शाहू संशोधन केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ वस्तुसंग्रहालय संकुलामधील राजर्षी शाहू कला दालनाला सर्व अधिकाऱ्यांनी भेट देऊन शाहू महाराजांच्या तेथील प्रतिमांनाही अभिवादन केले. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव, डॉ. देविकाराणी पाटील, सचिन घोरपडे उपस्थित होते.

2 7 JUN 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अवघा जिल्हा शाहूमय



शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमा पूजनप्रसंगी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्यासमवेत मान्यवर.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

**लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त आयोजित विविध उपक्रमांनी अवघा जिल्हा शाहूमय झाला होता. शाळा-महाविद्यालये, सरकारी-निमसरकारी कार्यालये, विविध पक्ष-संघटनांनी शाहूराजांना अभिवादन केले. मिरवणूक, व्याख्यान, वृक्षारोपण यासह विविध उपक्रम राबवण्यात आले. दिवसभर जिल्ह्यात छत्रपती शाहूंचा जयघोष घुमत होता.**

## केएसए

कोल्हापूर स्पोर्टस् असोसिएशनतर्फे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती छत्रपती शाहू स्टेडियम येथे साजरी करण्यात आली. ऑन. जनरल सेक्रेटरी माणिक मंडलिक यांच्या हस्ते प्रतिमा पूजन झाले. यावेळी ऑन. जॉ. जनरल सेक्रेटरी प्रा. अमर सासने, कार्यकारी सदस्य नितीन जाधव, संभाजीराव पाटील-मांगोरे, विश्वंभर मालेकर-कांबळे, दीपक घोडके आदी उपस्थित होते.

## शिवाजी विद्यापीठ

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते आणि ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर राजर्षी शाहू संशोधन केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ वस्तुसंग्रहालय संकुलामधील राजर्षी शाहू कलादालन येथेही अधिकाऱ्यांना भेट दिली. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव, डॉ. देविकाराणी पाटील, सचिन घोरपडे आदी उपस्थित होते.

लेफ्टनंट प्रा. जे. आर. भरमगोंडा, प्रा. समीक्षा फराकटे, प्रा. एस. पी. थोरात आदी उपस्थित होते.

एस. व्ही. शिंदे उपस्थित होते.

27 JUN 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट'चे बांधकाम वर्षात पूर्ण करा

## मंत्री चंद्रकांत पाटील यांची सूचना; शिवाजी विद्यापीठात इमारतीचे भूमिपूजन



**कोल्हापूर :** इमारत बांधकामाच्या कोनशिलेचे अनावरण उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते आज करण्यात आले. यावेळी शेजारी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आदी उपस्थित होते.

कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटची नवी इमारत राज्य शासनाने मंजूर केलेल्या १० कोटी रूपयांच्या निधीतून साकारली जाणार आहे. त्याचे भूमिपूजन आणि कोनशिलेचे अनावरण आज उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

कोणतीही कुचराई न होता वर्षभराच्या कालावधीत इमारतीच्या प्रस्तावित तळमजल्याचे बांधकाम पूर्ण करा. त्यादृष्टीने नियोजन करा, अशी सूचना मंत्री केसरकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना केली. विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त विद्यापीठात यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटची स्थापना करण्यात आली. त्या माध्यमातून ग्रामीण विकासासाठी पूरक व दिशादर्शक असे अभ्यासक्रम सुरू करण्यात आले. या विभागासाठी स्वतंत्र इमारत विद्यापीठाकडून प्रस्तावित करण्यात आली. मंत्री पाटील यांनी संबंधित इमारतीच्या नकाशांची पाहणी करून केवळ विद्यापीठातीलच नव्हे, तर परिसरातील एक आदर्श इमारत म्हणून याची उभारणी करावी, असे सुचविले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी मंत्री पाटील यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, महादेव देशमुख, मेघा गुळवणी, स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे समन्वयक डॉ. नितीन माळी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जे.आर. पाटील, अधीक्षक अभियंता श्याम कुंभार, उपअभियंता हेमा जोशी, ठेकेदार प्रशांत कदम, आजीवन अध्ययन केंद्राचे डॉ. रामचंद्र पवार, शारदाबाई पवार अध्यासनाच्या डॉ. भारती पाटील, डॉ. प्रकाश गायकवाड, तानाजी चौगुले, अमोल मिणचेकर उपस्थित होते.

### तीन मजली इमारत साकारणार

स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटच्या प्रस्ताविक इमारतीमध्ये तळमजला अधिक दोन मजले असणार आहेत. पहिल्या टप्प्यातील तळमजल्याच्या बांधकामास आज प्रारंभ करण्यात आला. या अंतर्गत एकूण २०५१.१५ चौरस मीटर बांधकाम होणार आहे. यासाठी सुमारे १० कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित आहे.

27 JUN 2023

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटच्या इमारतीचे भूमिपूजन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते सोमवारी झाले. यावेळी कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील उपस्थित होते.

# रुरल डेव्हलपमेंट इमारत वर्षभरात पूर्ण करा

## चंद्रकांत पाटील : शिवाजी विद्यापीठात भूमिपूजन, कोनशिलेचे अनावरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटच्या इमारतीचे प्रस्तावित बांधकाम येत्या वर्षभरात पूर्ण करा, अशा सूचना उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त विद्यापीठात यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटची स्थापना करण्यात येऊन त्या माध्यमातून ग्रामीण विकासासाठी पूरक व दिशादर्शक अशा अभ्यासक्रमांना प्रारंभ करण्यात आला. या विभागासाठी स्वतंत्र इमारत विद्यापीठाकडून प्रस्तावित करण्यात आली. त्या इमारतीच्या बांधकामाचे सोमवारी मंत्री पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन व कोनशिलेचे अनावरण झाले. मंत्री पाटील म्हणाले, परिसरातील एक आदर्श इमारत म्हणून याची उभारणी करावी, कामाच्या बाबतीत कोणतीही कुचराई न होता वर्षभराच्या कालावधीत इमारतीच्या प्रस्तावित तळमजल्याचे काम पूर्ण करा.

यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, आदि उपस्थित होते.

### अशी असेल इमारत

इमारतीमध्ये तळमजला अधिक दोन मजले असणार आहेत. एकूण २०५१.१५ चौरस मीटर इतके बांधकाम करण्यात येणार आहे. यासाठी १० कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी शासनाकडून पहिल्या टप्प्यामध्ये ५ कोटी ३५ लाख २८ हजार रुपये अनुदान प्राप्त झाले.

27 JUN 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल'चे बांधकाम पूर्ण करा

## मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या सार्वजनिक बांधकामला सूचना



**कोल्हापूर : यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटच्या इमारतीच्या बांधकाम प्रारंभप्रसंगी कोनशिला अनावरण करताना मंत्री चंद्रकांत पाटील आदी.**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटच्या इमारतीचे प्रस्तावित बांधकाम येत्या वर्षभरात पूर्ण करा, अशी सूचना उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना केली.

शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त विद्यापीठात यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटची स्थापना करण्यात येऊन त्या माध्यमातून ग्रामीण विकासासाठी पूरक व दिशादर्शक अशा अभ्यासक्रमांना प्रारंभ करण्यात आला. त्यासाठी राज्य शासनाने भरीव निधीचीही तरतूद केली. या विभागासाठी स्वतंत्र इमारत विद्यापीठाकडून प्रस्तावित करण्यात आली. त्या प्रस्तावित इमारतीच्या बांधकामास मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते राजर्षी शाहू जयंतीचे औचित्य साधून प्रारंभ करण्यात आला. सुरुवातीला मंत्री पाटील यांच्या हस्ते कुदळ मारून स्कूलच्या इमारतीचे भूमिपूजन करण्यात आले. त्यानंतर त्यांच्या हस्ते कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. त्यांनी कामाच्या बाबतीत कोणतीही कुचराई न होता वर्षभराच्या कालावधीत इमारतीच्या प्रस्तावित तळमजल्याचे काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. मेघा गुळवणी, डॉ. नितीन माळी, जे. आर. पाटील, श्याम कुंभार, हेमा जोशी, प्रशांत कदम, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. भारती पाटील, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. अमोल मिणचेकर आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# विद्यापीठात आज डॉ. बंग यांचे व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात मंगळवार, दि. २७ रोजी गांधीवादी विचारवंत डॉ. अभय बंग यांचे 'आजचे शिक्षण आणि महात्मा गांधी' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले आहे. दुपारी ४.३० वाजता मानव्यशास्त्र सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के असतील, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल. यावेळी दशरथ पारेकर यांनी लिहिलेल्या 'महात्मा गांधी आणि त्यांचे सांगाती' आणि 'महात्मा गांधींचे लोकविलक्षण अनुयायी : गोपराजू रामचंद्र राव' या दोन पुस्तकांचे डॉ. अभय बंग यांच्या हस्ते प्रकाशन होईल. या कार्यक्रमास ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. भारती पाटील, प्रसाद कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती असेल, अशी माहिती गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी दिली आहे.

लोकमत

# अभय बंग यांचे आज व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात आज मंगळवारी ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत डॉ. अभय बंग यांचे 'आजचे शिक्षण आणि महात्मा गांधी' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले आहे. यावेळी ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर यांच्या दोन पुस्तकांचेही प्रकाशन होणार आहे. सायंकाळी ४:३० वाजता मानव्यशास्त्र सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के असतील. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल. कार्यक्रमास ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. भारती पाटील, समाजवादी प्रबोधिनीचे सचिव प्रसाद कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

जनसंपर्क कक्ष
27 JUN 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




# डॉ. अभय बंग यांचे आज विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात मंगळवारी (दि. २७) दुपारी ४.३० वाजता मानव्यशास्त्र सभागृहात ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत डॉ. अभय बंग यांचे 'आजचे शिक्षण आणि महात्मा गांधी' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. यावेळी ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. भारती पाटील, प्रसाद कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती असेल. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी केले आहे.

पुढारी

# विद्यापीठ पदवी परीक्षेला ३ हजार ७२७ विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षेतंर्गत सोमवारी ३ हजार ७२७ विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यापीठ पदवी परीक्षा सध्या सुरू असून, सोमवारी बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ ऑर्टस्, मास्टर ऑफ बिझनेस अॅडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ सायन्स, बॅचलर ऑफ अॅग्रीकल्चर, मास्टर ऑफ लॉ, मास्टर ऑफ सोशलवर्क, बॅचलर ऑफ इंजिनिअरिंग, बॅचलर ऑफ जर्नालिझम, बॅचलर ऑफ वुमेन स्टडीज आदी १९ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या. दरम्यान, सोमवारी बी.ए. (डिफेन्स स्टडीज), बी.व्होक, नर्सिंग, अॅग्रीकल्चर मॅनेजमेंट, बी.ए. (ड्रेस मेकिंग) आदी दहा अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले.

आजअखेर सुमारे ९९ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

सकाळ

# विद्यापीठात आज डॉ. अभय बंग यांचे व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मंगळवारी(ता.२७) दुपारी साडेचार वाजता डॉ. अभय बंग यांचे 'आजचे शिक्षण आणि महात्मा गांधी' या विषयावर विशेष व्याख्यान होणार आहे. मानव्यशास्त्र सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहेत. यावेळी 'महात्मा गांधी आणि त्यांचे सांगाती' आणि 'महात्मा गांधींचे लोकविलक्षण अनुयायी: गोपराजू रामचंद्र राव' या पुस्तकांचे डॉ. बंग यांच्या हस्ते प्रकाशन होईल. या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी केले आहे.

27 JUN 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आज डॉ. अभय बंग यांचे व्याख्यान

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात उद्या (दि. २७) ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत डॉ. अभय बंग यांचे 'आजचे शिक्षण आणि महात्मा गांधी" या विषयावर विशेष व्याख्यान होणार आहे. याप्रसंगी डॉ. बंग यांच्या हस्ते ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर यांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन होईल. हा कार्यक्रम दुपारी ४.३० वाजता मानव्यशास्त्र सभागृहात होईल. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के तर प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. दशरथ पारेकर आणि डॉ. नंदा पारेकर यांच्या 'महात्मा गांधी आणि त्यांचे सांगाती" आणि 'महात्मा गांधींचे लोकविलक्षण अनुयायी: गोपराजू रामचंद्र राव" या दोन पुस्तकांचे प्रकाशन होईल. या कार्यक्रमास ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, शारदाबाई पवार अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील, समाजवादी प्रबोधिनीचे सचिव प्रसाद कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती राहील. तरी या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी केले आहे.

तरूण भारत

# वारी मार्गावर विद्यापीठातर्फे प्लास्टिकमुक्ती अभियान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमातील स्वयंसेवकांनी आषाढी वारीमध्ये प्लास्टीकमुक्ती अभियान राबवले. स्वच्छ वारी, निर्मल वारी, स्वस्थ वारी, हरित वारी असे विविध उपक्रम वारीमध्ये राबविण्यात आले. आषाढी वारीच्या सातारा जिल्ह्यातील लोणंद ते फलटण मार्गावर हे अभियान राबवण्यात आले. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी लोणंद येथे माऊलींच्या पालखीचे दर्शन घेऊन अभियानाचे उद्घाटन केले. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, दूरशिक्षण विभागाचे संचालक डॉ. डी. के. मोरे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगले, शरदचंद्र पवार महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. डी. बी. जाधव, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. कुंभार, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रभारी संचालक डॉ. एन.बी. माने उपस्थित होते. सातारा जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील १५० विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला. पालखी प्रस्थानानंतर संपूर्ण परिसराची स्वच्छता केली. दिंडी परिसरात पथनाट्ये सादर करून वारकऱ्यांचे प्रबोधन केले. फलटणच्या मुधोजी महाविद्यालयात वारी शिबिराचा समारोप झाला. प्रा. डॉ. शिंदे, डॉ. सुधीर इंगळे, प्रा. पाडवी, प्रा. संदिप पाटील, अमोल कुलकर्णी, किरण पवार उपस्थित होते.